अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# बेपत्ता विमान भारतासाठीसुद्धा एक आव्हान

मलेशियाचे विमान पळवले जाण्याची घटना रशियामध्ये सुरू असलेली यादवी, भारतामध्ये लागोपाठ पाणबुड्यांना होणारे अपघात, अमेरिकेत झालेला छोटासा स्फोट या सगळ्या घटना एकमेकांशी संबंधित नसल्या तरी त्या ज्या सलगपणे आणि ज्या काळात होत आहेत ते पाहिल्यावर पुन्हा एकदा दहशतवादाचे ढग गर्दी करू लागलेले दिसतात. क्वालालंपूरहून बीजिंगला जणारे विमान बेपत्ता होण्याचा प्रकार नुकताच घडला. या विमानाचा अपघात झाला की त्याचे अपहरण झाले. याचा अद्यापही पूर्ण निष्कर्ष निघालेला नाही. एका अनधिकृत माहितीनुसार या विमानाचे तालिबान्यांनी अपहरण केल्याची माहिती पुढे येत आहे. तब्बल अडीचशे प्रवासी असलेले हे विमान अचानकपणे बेपत्ता होते. त्याचे नेमके काय झाले. याचा आठ दिवस सुगावा लागत नाही. ही गोष्ट केवळ मलेशियाच नव्हे तर अनेक देशांसाठी चिंताजनकच होती. जवळपास जगातल्या पंचवीस देशांच्या वतीने शोधमोहीम घेतली गेली. तरीही त्याचा पत्ता लागला नाही. सगळ्या प्रकारची उपग्रह यंत्रणा असताना या विमानाचे साधे छोटेसे चित्र देखील मिळू शकलेले नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे विमान समुद्रात कोसळले असते तरी त्याचा काही ना काही मागमूस लागू शकला असता. परंतु अजूनही तसा पुरावा कोणालाच मिळालेला नाही. मात्र अनेक देशांच्या वतीने जी काही शोधमोहीम घेतली गेली आहे. त्यातून या विमानाचे तालिबानी दहशतवाद्यांकडून अपहरण झाल्याचे संकेत मिळू लागले आहेत. परंतु अपहरण झाल्यानंतर त्याचे पुढे काय झाले हे अजूनही गुलदस्त्यात आहे. कारण ज्या गूढ रीतीने हा सगळा प्रकार घडला. तो पाहिल्यावर त्याचा दहशतवाद्यांशीच संबंध असू शकतो. असे प्रथमदर्शनी तरी वाटू लागते. साधारणपणे जगभराचा विचार केला तरी लागोपाठ काही विशिष्ट घटना घडलेल्या दिसतात. दहशतवाद्यांचे नेटवर्क हे आतापर्यंत अशाच गूढ रितीनेच काम करीत आले आहे. एवढ्या मोठ्या बलाढ्य अमेरिकेला तिच्यावर झालेल्या दहशतवादी हल्ल्याची साधी कल्पनाही आली नव्हती. जगभरातला अनेक देशांच्या घडामोडींची गुप्तपणे माहिती मिळवणाऱ्या अमेरिकन गुप्तचर संस्थांना देखील थांगपत्ता लागू न देता तिथल्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर असेच प्रवाशांनी भरलेली विमान आदळवण्यात दहशतवादी यशस्वी झाले होते, तसाच काहीसा गूढ प्रकार मलेशियाच्या विमानाबाबत झालेला दिसून येतो. यासाठीच या विमानाचे बेपत्ता होणे जगातल्या अनेक देशांसाठी अतिशय चिंताजनक ठरते.

### धोक्याचा इशारा

हे विमान मलेशियाचे असले आणि क्वालालंपूरहून बीजिंगला जात होते तरीसुध्दा ते एकूणच भारताच्या बऱ्याच हवाई टप्प्यात होते. त्याच्या अपहरणाची बातमी कळताच भारतीय सुरक्षा यंत्रणांच्या छातीतही धडकी भरली. कारण ती घटनाच तशी होती. दोन महिन्यांपूर्वी भारतातल्या गुप्तचर यंत्रणांना दहशतवादी पुन्हा सक्रिय होत असल्याची माहिती मिळाली होती. एवढेच नव्हे तर अमेरिकेतल्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर झालेल्या हल्ल्याप्रमाणे भारतातही तसाच हल्ला घडवण्याची दहशतवाद्यांची योजना आहे, असेही सांगितले गेले होते. म्हणूनच हे विमान जेव्हा बेपत्ता झाले त्यावेळेला ते भारतीय हद्दीत आणून भारतातल्या कुठल्या ठिकाणांवर आदळवले जाते की काय, अशी भीतीही वाटू लागली होती. या विमानाचे धागेदोरे जरी मिळाले नसले तरी या विमानाच्या माध्यमातून घातपात घडवण्याची शक्यता अगदीच फेटाळून लावता येत नाही. किंबहुना या विमानाचे अपहरण किंवा अपघात ही दहशतवाद्यांची पुढच्या कारस्थानाची पूर्वतयारी असू शकते. भारताने तो आपल्यासाठी गंभीर इशाराच मानला पाहिजे. देशातल्या सगळ्याच तमाम सुरक्षा यंत्रणांना हाय अॅलर्टच दिला पाहिजे. केवळ मलेशियन विमानाचे अपहरण झाले म्हणून कानाडोळा करता कामा नये. कोणत्याही दहशतवाद्यांना संधी मिळेल असे भारताकडून घडता कामा नये. पुढचे तीन महिने सगळा भारत लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीने ढवळून निघेल. अनेक सुरक्षा यंत्रणा निवडणुकीच्या कामात गुंतल्या जातील. कदाचित या परिस्थितीचा गैरफायदा घेतला जाण्याची शक्यता आहे. एकूणच भारताच्या दृष्टीने घडलेल्या घटना देखील विचार करायला लावणाऱ्या ठरतात. कारण आठ महिन्यांमध्ये नौदलामध्ये तेरा अपघात घडले आहेत. दहा पाणबुड्या अपघातग्रस्त झाल्या जहाजांनाही त्यातून मोठे नुकसान झाले. त्याची आज कोणतीही वेगवेगळी कारणे सांगितली जात असली, तरी त्या कारणांबरोबरच घातपात आणि दहशतवाद्यांचे कारस्थान या मुद्द्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कारण भारताकडे अजूनही दहशतवाद्यांची वक्रदृष्टी आहे आणि सरकारही त्याबाबत पाहिजे तितके कठोर झालेले नाही.

### जग सुन्न झाले

एकूणच परिस्थितीचा अंदाज घेतल्यावर मोठमोठ्या देशांपुढे सुरक्षेचे आव्हान निर्माण करण्यात दहशतवादी यशस्वी होताना दिसतात. सर्व प्रकारच्या आधुनिक यंत्रणा आधुनिक शस्त्रास्रे गुप्तचर व्यवस्था उपग्रहांचा त्यासाठी केला जाणारा उपयोग अशा सगळ्या गोष्टी असूनही दहशतवादी तितकेच सुसज्ज असल्याचे पहायला मिळते. प्रामुख्याने त्यांचा अमेरिकेवर असलेला राग अजूनही विसरलेले नाहीत. तर जगातल्या विविध देशांमधले दहशतवादी गट त्या त्या ठिकाणी आपले वर्चस्व दाखवण्याचा प्रयत्न करत आहेत. चीनमध्येसुध्दा गेल्या महिन्यात दहशतवाद्यांनी आपली झलक दाखवण्याचा प्रयत्न केला. तर रशियामध्ये असेच कट्टरतवादी गट आपला प्रभाव निर्माण करीत आहेत. काही काळ शांततेत गेल्यानंतर दहशतवादी पुन्हा सक्रिय होतात, असा अनुभव आहे. कुठल्या तरी संधीचा ते शोध घेत असतात. ज्या ठिकाणी आणि ज्या माध्यमातून आपला डाव यशस्वी करता येईल असे त्यांचे प्रयत्न असतात. जगामधले एकूणच शांतता टिकावी असे आशादायी चित्र दिसत नाही. या पार्श्वभूमीवर या आधुनिक यंत्रणांना मागे टाकून किवा गुंगारा देऊन एखादे विमान बेपत्ता होण्याची घटना सगळ्या जगाला सुन्न करणारी ठरते. किंबहुना पुढच्या धोक्याचा तो मोठा इशाराही ठरू शकतो. समाधानाची गोष्ट एवढीच आहे की अशा कठीण प्रसंगामध्ये जगातले पंचवीस देश एकत्र येतात आणि शोधमोहीम घेतात. तरीदेखील जगातल्या अधिकाधिक देशांनी अशा प्रकारच्या प्रसंगांच्यावेळी एकत्र आले पाहिजे. निदान घातपात करणाऱ्या संघटनांना इशारा किंवा संदेश मिळू शकतो.